# मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यालयाचे औरंगाबाद येथे उद्घाटन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यालय परिषदेच्या स्वतःच्या वास्तूत व्हावे ही परिषदेच्या आजीव सभासदांची अनेक वर्षापासूनची इच्छा होती. यासाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळया शहरात वास्तू खरेदीच्या दृष्टीने प्रयत्नही करण्यात आले, परंतु त्या त्या वेळच्या अनेक अडचणीमुळे परिषदेची वास्तू करण्याचे स्वप्न पूर्णत्वास जाऊ शकले नाही. परिषदेच्या आजीव सभासदांनी, सर्व माजी अध्यक्षांनी, आजपर्यतच्या सर्व विश्वस्तांनी, सर्व माजी कार्याध्यक्षांनी, सर्व माजी कार्यवाह-खाजीनदारांनी, आजपर्यतच्या सर्व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी केलेल्या प्रयत्नाची फलश्रुती म्हणजे औरंगाबाद येथे संपन्न झालेला परिषदेच्या कार्यालयाचा उद्घाटन सोहळा होय.

दिनांक **१९ फेब्रुवारी २०२३** रोजी **शिवजयंतीचे** औचित्य साधून मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर.बी. भांडवलकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेच्या कार्यालयाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी अध्यक्षाच्या हस्ते फीत कापून वास्तूत प्रवेश करण्यात आला व परिषदेच्या कोनशिलेचे अनावरण करून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. व्ही. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. परिषदेच्या वास्तू स्वप्नपूर्तीचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जाणवत होता.

यावेळी परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ.मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, विश्वस्त डॉ. अजय दरेकर, डॉ. विकास सुकाळे, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. दिलीप अर्जुने, डॉ. बलवंत कोरे, डॉ. माधव शिंदे, डॉ. दयालु राठोड, प्राचार्य डॉ. संजय धनवटे, डॉ. विजय भोपाळे, डॉ. राजाराम पाटील, डॉ. जितेंद्र तलवारे, स्विकृत सदस्य डॉ. विलास खंदारे, डॉ. वनिता चौरे, परिषदेचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुर्यकांत जगदाळे, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ. चारु गोखले, डॉ. श्रीराम जोशी, प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांची विशेष उपस्थिती होती. आजीव सभासद डॉ. एम.जी.पाटील, डॉ. शिवाजी यादव,डॉ. प्रशांत हरमकर, डॉ. विश्वनाथ कोक्कर, आश्रू मोरे, नितीन वाव्हळे, यांचीही यावेळी उपस्थित होते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यालयाचा पत्ता पुढील प्रमाणे. **मराठी अर्थशास्त्र परिषद, 'देवगिरी', दालन क्रमांक ६, सैनिकी विहार कॉलनी, गट क्रमांक ४९, जल व भूमी व्यवस्थापन संस्थेच्या (वाल्मी) समोर, पैठण रोड, कांचनवाडी, औरंगाबाद.**

डॉ. मारोती तेगमपुरे ,

कार्यवाह – खजिनदार,

मराठी अर्थशास्त्र परिषद.